# प्रस्तावना

इ.स.१९३५ मध्ये ब्रिटीश सरकारने कायदेशीर तरतुद करून भारतीय स्त्रियांसाठी स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती केली व त्यांना प्रत्यक्ष निवडणुकीमध्ये भाग घेण्याचा अधिकार देऊ केला. या कायद्यामुळे भारतीय स्त्री जीवनातील एक नवीन पर्व सुरू झाले. १९व्या शतकात भारतीय स्त्रियांवर अनेक बंधने रूढी, परंपरा यांच्या नावाखाली लादण्यात आली होती. सतीची चाल, बाल विवाह, विधवा विवाह बंदी या रूढी परंपरांनी स्त्रियांचे जीवन असहाय्य झाले होते. शिक्षणापासून व सामाजिक स्वातंत्र्यापासून स्त्रियांना वंचित ठेवण्यात आले होते. त्यामुळे भारतीय स्त्री जीवनाची प्रगती थांबलेली होती. ब्रिटीशांच्या आगमनाने पाश्चात्य विचार, शिष्टाचार, शिक्षणपध्दती भारतात आली. या नवविचाराने प्रेरीत झालेला भारतीय तरूण वर्ग भारतीय समाजात असणाऱ्या रुढी परंपरा विरूध्द उभा राहिला. १९ व्या शतकात स्त्री जीवनाला एक नवीन दिशा आणि गती मिळाली. स्त्रियावर होणारे सामाजिक अन्याय ब्रिटीशांनी केलेल्या सती बंदीचा कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा, विधवा विवाह कायदा अशा कायदयांमुळे काही प्रमाणात कमी झाला. तसेच स्त्री शिक्षणासाठी ब्रिटीशांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले त्यातून प्रेरणा घेऊन महात्मा ज्योतीबा फुले यांनी १८४८ ला पुण्याला मुलीसाठी शाळा सुरू केली. त्यांच्या या कार्यात त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांनी मोलाची मदत केली. हळूहळू स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. त्यांना नव विचाराची ओळख होऊ लागली. यातून पंडीता रमाबाई, आनंदीबाई जोशी अशा महिला विदेशी शिक्षण घेऊ शकल्या. त्यांनी आपले शिक्षण पुर्ण केल्यावर स्त्री सुधारणा चे प्रयत्न सुरू केले.

ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरूष' तुलना हा ग्रंथ लिहून पुरुष प्रधानतेवर प्रहार केला. जानक्का शिंदे यांनीही परखड मते मांडून स्त्रियांच्या दु:खांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. यामुळे स्त्रियांमध्ये नवविचारांची जाणीव होऊन; त्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व विविध क्षेत्रात निर्माण केले. याची परिनिती १९३५ मध्ये ब्रिटीश सरकारने स्त्रियांना 'स्वतंत्र मतदार संघ' देण्यात झाली. त्यामुळे स्त्रियांचा राजकारणात सक्रिय सहभाग झाला. यात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांचा गोठया प्रमाणात सहभाग होता. या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्याचा सखोल सटीक अभ्यास करणे सोयीचे व्हावे म्हणून अभ्यासाचे क्षेत्र 'पश्चिम महाराष्ट्रा' पुरते सिमित ठेवले आहे.

शोध प्रबंधासाठी 'पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणात महिलांचा सहभाग' हा विषय निवडण्याचे

बहुविध प्रयोजन आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात मुंबई प्रांत हा ब्रिटीशांचा एक प्रशासकी य विभाग होता. मुंबई प्रांत अनेक चळवळीचे केंद्र होते. तसेच या प्रांतात विविध सुधारणावादी चळवळी सुरू झाल्या होत्या. मुंबई प्रांतातील नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर ही जिल्हयांची केंद्रे वेगवेगळ्या चळवळीसाठी, सुधारणासाठी प्रकाश झोतात होती . ब्रिटीश प्रशासनाविरूध्द जशा प्रतिक्रिया या भागात उमटत होत्या; त्याच प्रमाणे सामाजिक सुधारणाच्या संदर्भातही येथे विशेष प्रयत्न होत होते.

मुंबई प्रांतातील स्त्रिया पुरूषाच्या बरोबरीने अनेक आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. स्त्रियांनी कांही आघाडया स्वत: नेतृत्व करून लढविल्या होत्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चलेजाव चळवळ, पत्री सरकार, जंगल सत्याग्रह, मुळशी सत्याग्रह, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या विविध आंदोलनात महिलांनी हिरीरीने भाग घेतला होता. अशा महिलांमध्ये रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई उर्फ बया कर्वे, जानकीबाई आपटे, कमलाबाई होस्पेट, शांताबाई भालेराव, गोदावरी गोखले, आंबिका जोगळेकर, मिनाक्षी साने, शांताबाई शिरकर अशा कितीतरी महिलांनी स्त्री उध्दारासाठी वाहून घेतले होते. त्याच बरोबर स्वातंत्र्याच्या लढयात भाग घेतल्यामुळे त्यांचा वारसा घेऊन महिला राजकारणात पश्चिम महाराष्ट्रातील लक्ष्मीबाई ठुसे, सुमतीबाई गोरे, श्रीमतीबाई कळंत्रे, सरोजिनी बाबर, निर्मलादेवी भोसले, मालती शिरोळे, प्रभावती झाडबुके, उषाताई जगदाळे, शैलजा शितोळे, लताबाई तांबे , निर्मला ठोकळ, लिलाताई मर्चंट या पश्चिम महाराष्ट्रातील महिलांनी महाराष्ट्राचे विधीमंडळ गाजविले. अनुसया काळे, ताराबाई सप्रे, विजयामाला भोसले, शारदा मुखर्जी, प्रेमलाकाकी चव्हाण, रोझा देशपांडे, ताराबाई साठे, शकुंतलाबाई परांजपे या महाराष्ट्रातील महिलांनी केंद्रीय कायदेमंडळात आपले कर्तृत्व सिध्द केले. या सर्व महिलांच्या कार्यांची इतिहासात नोंद व्हावी व त्याचा अभ्यास करणे विचार प्रवर्तक ठरेल म्हणून या विषयाची प्रस्तुत प्रबंधासाठी निवड केली आहे.

संशोधनाचा कालखंड इ.स.१९३५ ते १९७५ असा निश्चित केला आहे त्यामागचा उद्देश असा की इ.स.१९३५ च्या कायदयाने पहिल्यांदा महिलांसाठी स्वतंत्र मतदार संघ देऊ केले होते. तेथूनच खऱ्या अर्थाने हिंदुस्थानच्या सक्रिय राजकारणात महिलांचा प्रवेश होण्यास मोठी मदत झाली. म्हणून जाणीवपूर्वक या विषयाची सुरूवात इ.स.१९३५ ला सुरू केली आहे. पुढे स्त्रियांनी आपल्याला मिळालेल्या या हक्काचा पुरेपुर उपयोग करून आपल्या अंगचे सर्व गुण दाखविण्याचा प्रयत्न केला याचा परिणाम

भारतीय राजकारणात सर्वोच्च पदावर २४ जानेवारी १९६६ रोजी एक महिला श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान पदापर्यंत पोहोचल्या. एकेकाळी ज्या समाजाने स्त्रियांना सर्व हक्क नाकारले होते; त्याच भारतीय समाजात अतिउच्च पदावर स्त्रीने अरूढ होणे हा योगायोग नसून स्त्रियांनी केलेल्या परिश्रमाचे फळ होते. इ.स.१९७५ पर्यंतचा कालखंड श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पंतप्रधान कारकिर्दीचा भरभराटीचा कालखंड होता. म्हणून हा विषय इ.स.१९७५ पर्यंत नेण्याचा प्रयत्न केला आहे.

'पश्चिम महाराष्ट्रातील महिलांचा राजकारणात सहभाग १९३५ ते १९७५' या विषयावर किंवा यातील कोणत्याही भागावर आतापर्यंत कोणतेही संशोधन झालेले नाही. काही स्त्रियांच्या जीवनावर चरित्रे, किंवा कार्याचा आढावा घेणारे काही ग्रंथ लिहिले आहेत. परंतु ते संशोधन कार्य म्हणून नाही.

या संशोधन कार्यातून महिलांचा राजकारणातील प्रवेशाने एकूण राजकारणावर, समाजावर झालेल्या विविध परिणामावर प्रकाश टाकता येईल. तसेच राजकारणात महिलांचा प्रवेश झाल्यामुळे त्याचा सामाजिक जीवनावर काही विपरीत परिणाम झाला आहे काय ? महिलांचा राजकारणातील प्रवेश योग्य कि अयोग्य? समाजातील महिलांचा दर्जा उंचावला कि ढासाळला ? कुटूंब व्यवस्थेवर , विवाह संस्थेवर काही परिणाम झाला आहे काय ? भारतीय संस्कृतीला त्यामुळे काही धोका निर्माण झाला नाही ना ? सामाजिक जीवन सुदृढ बनण्यास मदत होते काय ? पुरुषप्रधान संस्कृतीवरती आघात तर होत नाही ना ? स्त्रियांनी ३३ % आरक्षण मागणे न्याय आहे काय ? अशा विविध प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रबंधाद्वारे केलेला आहे. तसेच या विषयावर संशोधन कार्य झालेतर या उपेक्षित विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधले जाईल. म्हणुन हा विषय जाणीवपुर्वक निवडला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणांत महिलांचा सहभाग या प्रबंधासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व साधने महाराष्ट्रभर विखुरलेली आहेत. अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने साधनांचे प्राथमिक साधने, दुय्यम साधने असे वर्गीकरण केले आहे.

प्राथमिक साधनांमध्ये विविध पुराभिलेखागारातील, ग्रंथालयातील साधनांचा तसेच मुलाखती यांचा समावेश केला आहे. मुंबई पुराभिलेखागार, येथील विविध सरकारी गॅझेट, मुंबई मराठी ग्रंथालय दादर येथील विविध स्त्री विषयक नियतकालिका स्टेट सेंन्ट्रल लायब्ररी महाराष्ट्र राज्य मुंबई येथील शासकीय फाईल्स. पुणे शासकिय ग्रंथालय येथील विविध कागदपत्रे, विधीमंडळातील नोंदी तसेच ज्या महिलांचा

प्रत्यक्ष अभ्यास करावयाचा आहे; सरोजनी बाबर, प्रभावती झाडबूके , उषाताई जगदाळे, शैलजा शितोळे , लताबाई तांबे, निर्मला ठोकळ, लिलाताई मर्चंट , प्रेमलाकाकी चव्हाण , या सर्व स्त्रियांच्या मुलाखतीं तसेच समकालीन वर्तमानपत्रे यात केसरी , मराठा, तरूणभारत, महाराष्ट्र टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया , इंडियन एक्स्प्रेस, नवाकाळ, आवाज, नवयुग या वर्तमान पत्रातून अभ्यास कालखंडातील महिलांच्या मुलाखती, त्यांच्यावरील लेख, याद्वारे मिळालेली माहिती तसेच समकालीन नियतकालिकांमध्ये लोकप्रभा (साप्ताहिक), यशमंथन, मिळून साऱ्याजणी, माहेर मासिक, महाराष्ट्र महिला , मनोरंजन, मराठी संशोधन पत्रिका (त्रैमासिक), रत्नाकर, सत्यकथा, साधना (साप्ताहिक), साप्ताहिक युगांतर, स्त्री मासिक, सोबत (साप्ताहिक), ज्ञानप्रकाश, ज्ञानमंदिर या नियतकालिकांमधून अभ्यास कालखंडातील महिलांच्या मुलाखती त्यांच्यावरील लेख, याद्वारे मिळालेली माहिती समावेश प्राथमिक साधने म्हणून केला आहे.

दुय्यम साधनामध्ये सबंधित स्त्रियांवरती लिहलेली चरित्रे, आत्मचरित्र , विविध ग्रंथ, स्त्रियांच्या नातेवाईकांनी प्रत्यक्ष भेटीत दिलेली माहिती स्त्री संघटनाच्या व राजकीय पक्षांच्या विविध कार्यालयात उपलब्ध झालेली माहिती, दुय्यम साधने म्हणून स्विकारलेली आहे.

**दीपक सोपान वेडे**

**पुणे**

**२६/१२/२००२**